**कृपया प्रसिद्धीसाठी** **20 डिसेंबर 2011**

## बोरीवलीच्या एलआयसी कॉलनीच्या मुख्य रस्त्याचे
## माजी नगरसेवक कै. डॉ. वासुदेव श्रृंगी मार्ग नामकरण

**मुंबई, मंगळवार:** ''पाकिस्तानातून निर्वासित म्हणून आलेल्या डॉ. वासुदेव श्रृंगी यांनी बोरीवली परिसरात आधी भारतीय जनसंघ व नंतर भाजपा रुजविण्याचे काम काम केले. एलआयसी कॉलनीतील मुख्य रस्त्याचे डॉ. वासुदेव श्रृंगी मार्ग नामकरण करुन त्यांनी केलेल्या समाजसेवेचे ऋण आपण व्यक्त करीत आहोत'', असे गौरवोद्‌गार माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी उद्‌घाटन करताना काढले. हे नामकरण घडविल्याबद्दल स्थानिक नगरसेविका व माजी महापौर डॉ. शुभा राऊळ यांचे त्यांनी विशेष आभार मानले.

डॉ. वासुदेव श्रृंगी हे आधी भारतीय जनसंघाचे व त्यानंतर भाजपाचे नगरसेवक म्हणून एलआयसी कॉलनी परिसरातून निवडून येत असत. येथील निर्वासितांचे व स्थानिकांचे ते आधारस्तंभच होते. पण त्यांचे इथले घर हे सुरुवातीच्या काळात जनसंघ-भाजपाचे केंद्रस्थानच होते अशा शब्दात यावेळी बोलताना श्री. राम नाईक यांनी त्यांच्या आठवणी सांगितल्या. माजी महापौर डॉ. शुभा राऊळ यांनीही पक्ष वेगळे असले, तरी समाजकार्य करताना कै. डॉ. श्रृंगी यांनी वडिलांच्या मायेने मार्गदर्शन केल्याचे आवर्जून सांगितले.

शिवसेना आमदार डॉ. विनोद घोसाळकर, भाजपा आमदार श्री. गोपाळ शेट्टी यांचीही यावेळी भाषणे झाली. प्रभाग समिति अध्यक्ष श्री. प्रवीण शहा, कै. डॉ. वासुदेव श्रृंगी यांचे सुपुत्र श्री. कमलेश श्रृंगी व अन्य श्रृंगी परिवार, स्थानिक भाजपा नेता सर्वश्री रामजस उपाध्याय, करुणाशंकर ओझा, श्रीकांत पांडे, अॅड. जयप्रकाश मिश्रा, दिलीप पंडित, जगदीश ओझा, बाळकृष्ण धमाले, आदीं यावेळी उपस्थित होते.

**(कार्यालय सचिव)**